प्रकरण दुसरे
संबंधित साहित्याचा आढावा

२.१ प्रस्तावना

२.२ साहित्य समालोचनाची उद्दिष्टये

२.३ संशोधनाशी संबंधित साहित्य

२.४ पर्यावरण जाणीवजागृती सामाण्य निष्कर्ष

२.५ समारोप

प्रकरण दुसरे
संबंधित साहित्याचा आढावा

२.१ प्रस्तावना :

प्रस्तुत संशोधनाबाबत संबंधित साहित्याचे सिंहावलोकन करणे महत्वाचे आहे. कारण त्याच्याच सहाय्याने संशोधकाला तुलनात्मक दृष्टीकोन, योग्य संशोधन पध्दती आणि संशोधन तंत्राबाबत निश्चित कल्पना येईल.

या संबंधात Whitney (1954) यांनी आपल्या Element of Research या ग्रंथात म्हटले आहे.

"The student should find, analyse and evaluate critically every pertinent research report dealing with his choosen problem. Anything less than this will be neither sensible nor scientific."

"The review of the literature promotes a greater understanding of the problem and it's crucial aspects and ensures the avoidance of unnecessary duplication. It also provides comparative data on the basis of which to evaluate and interpret the significance of one's finding. In addition it contributes to the scholarship of the investigator. No. Experienced researcher would think of undertaking a study without acquinting him-self with the contribution of previous investigator."

संबंधित संशोधन साहित्याचे सिंहावलोकन करण्याची उद्दिष्टे खालील प्रमाणे आहेत.

१) निवडलेल्या संशोधन विषयासंबंधी पूर्ण झालेल्या संशोधनाची कल्पना येण्यासाठी आणि त्याची पुनरावृत्ती टाळून योग्य विषय निवडण्यासाठी मार्गदर्शन प्राप्त करणे.

२) निवडलेल्या संशोधन विषयाच्या बाबतीत आवश्यक अशा पध्दती, तंत्र इत्यादी बाबतीत माहिती प्राप्त करून घेणे.

३) संशोधन विषयाशी संबंधित सिध्दांत आणि कार्याची रचना समजून घेणे.

४) माहिती आणि निष्कर्ष यांच्या बाबतीत माहिती प्राप्त करणे, योग्य सांख्यिकी तंत्र आणि त्याचा उपयोग अथवा अर्थनिर्वचन करण्यासाठी मार्गदर्शन प्राप्त करणे.

५) संदर्भ साहित्याचे अवलोकण करून आपल्या ज्ञान साम्रगीत वाढ करणे.

२.२ साहित्य समालोचनाची उद्दिष्टये :

संशोधित साहित्याचे समालोचनाची उद्दिष्टये खालील प्रमाणे.

१) निवडलेल्या विषयासंबंधी पूर्ण झालेल्या संशोधनाची कल्पना प्राप्त करून त्याची पुनरावृत्ती टाळणे व योग्य संशोधनविषय निवडण्यास मार्गदर्शन मिळवणे.

२) निवडलेल्या विषयासंबंधी आवश्यक योग्य पध्दती, तंत्र यांच्याबद्दल माहिती मिळविणे.

३) आधार सामुग्री व निष्कर्ष याविषयी तुलनात्मक माहिती मिळविणे. समर्पक सांख्यिकी तंत्र व त्याचा उपयोग आणि निर्वचन करण्यासाठी मार्गदर्शन प्राप्त करणे.

४) संदर्भ साहित्याचा अभ्यास करून स्वत:ची गुणवत्ता वाढविणे.

प्रस्तुत संशोधनाशी संबंधित जे संशोधन झालेले आहे त्याचा आढावा पुढे घेतला आहे.

२.३ संशोधनाशी संबंधित साहित्य :

संबंधित संशोधन साहित्याच्या अवलोकनासाठी दिलेल्या अभ्यास संचामध्ये सन १९८० ते १९९६ सालामधील एकूण १३ संशोधन अहवालांचा विचार करण्यात आलेला आहे. ते खालील प्रमाणे आहत.

राजपुत जे.एस., सक्सेना ए.बी., जाधव व्ही.जी.

शिक्षणशास्त्र महाविद्यालय भोपाळ,(१९८०)

यांनी प्राथमिक स्तरावरल अध्यापनातील पर्यावरण दृष्टीकोन अभ्यास या विषयावर संशोधन केले आहे.

संशोधनाची प्रमुख उद्दिष्टे पुढील प्रमाणे.

१) वैज्ञानिक आणि सामाजिक पर्यावरणासंबंधी विद्यार्थ्यांमधील जाणीव याचा अभ्यास करणे.

२) अध्यापनासाठी उपलब्ध असलेली साधने यांचा शोध घेणे.

या संशोधनाच महत्त्वपूर्ण निष्कर्ष खालील प्रमाणे आहेत.

१) संशोधनावरून असे दिसून येते की, उत्तर चाचणीमध्ये प्रायोगिक गटाला, नियंत्रित गटापेक्षा जास्त गुण होते.

२) विद्यार्थ्यांच्या पर्यावरण जाणीव जागृतीमध्ये, पर्यावरण जाणीव जागृती चाचणीमुळे वाढ होते.

दिलीप जी.पी., पटेल एन.ए. (१९८१)

प्राथमिक शिक्षकांच्या पर्यावरण जाणीव जागृतीचा अभ्यास - या विषयावर संशोधन केले आहे.

१) प्राथमिक शिक्षकांचे पर्यावरणासंबंधी जाणीव जागृतीचे स्वरूप शोधणे.

२) भौगोलिक प्रदेशाचा शिक्षकांच्या पर्यावरण जाणीवावर होणारा परिणाम अभ्यासणे.

३) शिक्षकांच्या अध्यापन अनुभवाचा पर्यावरण जाणीवावर होणारा परिणाम अभ्यासणे.

४) प्राथमिक शिक्षकामध्ये लिंगभेदानुसार पर्यावरण जाणीवा पाहणे.

या संशोधनाचे महत्वपूर्ण निष्कर्ष खालील प्रमाणे.

१) शिक्षकांच्या अनुभवाचा पर्यावरण जाणीवावर अनुकूल परिणाम होतो. परंतु प्रदेशानुसार होणारा परिणाम गौन दिसून येतो.

२) शहरी भागातील जास्त अनुभव असलेले पुरूष-शिक्षक पर्यावरण शिक्षणाबाबत जास्त जाणीव असलेले आहेत.

जोशी बी.पी. (१९८१)

उच्च प्राथमिक स्तरावर पर्यावरण दृष्टिकोनावर आधारति विज्ञान शिक्षणाचा विकास -एक अभ्यास या विषयावर संशोधन केले आहे.

संशोधनाची प्रमुख उद्दिष्टये पुढील प्रमाणे.

१) राजस्थानमधील शहरी व ग्रामीण भागातील पर्यावरण समस्येचा अभ्यास करणे व त्यांचा दर्जा ठरविणे.

२) पर्यावरण समस्येचा अभ्यासक्रमात अंतर्भाव करणे.

या संशोधनाचे महत्वपूर्ण निष्कर्ष खालील प्रमाणे .

१) उच्च प्राथमिक स्तरावर पर्यावरण शिक्षण हे विद्यार्थ्यांचे ज्ञान व कौशलये वाढविण्यासाठी तसेच पर्यावरण दृष्टीकोन व वर्तन यासाठी तसेच पर्यावरण मूल्यांचे महत्व ओळखण्यासाठी उपयोगी आहे.

२) अभ्यासक्रम हा पर्यावरण केंद्रीत नाही. नैसर्गिक संपत्ती, पाणी, हवा, प्रदूषण, प्राणी रक्षण यांचा अंतर्भाव नाही.

गुप्ता व्ही. पी., ग्रेवाल जी. एस., राजपुत जे.एस. (१९८१)

"ग्रामीण आणि शहरी भागातील शाळेतील विद्यार्थ्यांची पर्यावरण जाणीव व अनौपचारिक शिक्षण केंद्र" - एक अभ्यास या विषयावर संशोधन केले आहे.

संशोधनाची प्रमुख उद्दिष्टये पुढील प्रमाणे आहेत :

१) ग्रामीण व शहरी भागातील मुलांच्यामध्ये पर्यावरण जाणीवा संदर्भात कमतरता झालेले घटक क्षेत्रे शोधणे.

२) शाळेत जाणारे विद्यार्थी व अनौपचारिक केंद्रात शिक्षण घेणारे विद्यार्थी यांच्यामधील पर्यावरण जाणीवा संदर्भात तुलना करणे आणि प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकरण करण्यासाठी पर्यावरणावर आधारित अभ्यासक्रम तयार करणे.

या संशोधनाचे महत्वपूर्ण निष्कर्ष खालील प्रमाणे आहेत :

१) ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण अस्तित्वासंबंधित सार्थक सह संबंध दिसून येतो. ग्रामीण विद्यार्थ्यांमध्ये अनुकूलता आहे.

२) अनौपचारिक ग्रामीण आणि औपचारिक शहरी विद्यार्थ्यामध्ये सार्थक सहसंबंध दिसून येतो. (पर्यावरण जाणीव संबंधी) परंतु अनौपचारिक ग्रामीण आणि औपचारिक ग्रामीण विद्यार्थ्यामध्ये पर्यावरण जाणीवा संबंधी सार्थकता दिसून येत नाही.

इहसन जे.एस., गुप्ता पी.के. (१९८६)

प्राथमिक स्तरावर पर्यावरण शिक्षणा विषयी विद्यार्थ्यांचा दृष्टीकोन - एक अभ्यास या विषयावर संशोधन केले आहे.

१) ३ री, ४ थी व ५ वी च्या अभ्यासक्रमातील सर्व घटक विद्यार्थ्याची गरज, क्षमता, अभिरूची व अनुभवानुसार आहेत.

२) बहुतांशी शिक्षकांनी पर्यावरण शिक्षणाविषयी सकारात्मक दृष्टीकोन दाखवला आहे.

३) पर्यावरण शिक्षण हा विषय एकात्मिक स्वरूपात घेण्याविषयीची जाणीव शिक्षकांना कमी आहे.

राजपूत जे.एस. (१९८८)

प्राथमिक स्तरावर पर्यावरण दृष्टीकोन सुधारणेसाठी अध्यापन कौशल्य ओळखणे आणि प्रशिक्षण कार्यनितीचा एक अभ्यास - या विषयावर संशोधन केले आहे.

या संशोधनासाठी प्रमुख उद्दिष्टये पुढील प्रमाणे

१) वर्ग ३ ते ५ साठी पर्यावरण अभ्यासासाठी (सामाजिक अभ्यास) आणि (विज्ञान) साहित्य तयार करणे.

२) पर्यावरण दृष्टिकोनामधून वर्ग ३ आणि ४ साठी पर्यावरण शिक्षण अध्यापनासाठी (I व II) कार्यनिती विकसित करणे व चाचणी घेणे.

३) प्राथमिक शिक्षणाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी तयार केलेल्या कार्यनितीचा, पध्दतीचा वापर करणे.

४) पर्यावरण शिक्षणाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी तयार केलेल्या कार्यनितीचा, पध्दतींचा वापर करणे.

५) पर्यावरण दृष्टीकोनातून अध्यापन कौशल्य ओळखणे.

या संशोनाचे महत्वपूर्ण निष्कर्ष खालील प्रमाणे आहेत :

१) पर्यावरण जाणीव जागृतीसाठी प्रायोगिक व नियंत्रीत गटाच्या पूर्व चाचणी व अंतिम चाचणीच्या गुणावरून असे दिसून आले की - १४ गटामधील ७ शाळेतील ब गटामध्ये फारसा फरक दिसून आला नाही. परंतु राहिलेल्या ५ गटामध्ये फरक दिसून आला.

२) दोन गटांच्या तुलनेवरून तसेच त्याच गटामध्ये निकालावरून असे दिसून आले की एकूण १४ गटापैकी ५ गटामध्ये सार्थ फरक दिसून आला नाही.

३) सार्थ सहसंबंध असलेले काही गट एकच नमुना अनुसरत नाहीत.

शहानवाज, १९९०

माध्यमिक आणि उच्च माध्यमिक स्तरावरील शिक्षक आणि विद्यार्थ्यांचा पर्यावरण जाणीवजागृती व पर्यावरण दृष्टिकोन - या विषयावर संशोधन केले आहे.

संशोधनाची प्रमुख उद्दिष्टे पुढील प्रमाणे आहेत.

१) विद्यार्थी शिक्षकांमध्ये असलेल्या पर्यावरणासंबंधी जाणीवा पाहणे.

२) पर्यावरणासंबंधी शिक्षक आणि विद्यार्थीचा दृष्टीकोन शोधणे.

३) विद्यार्थ्यांपेक्षा शिक्षकांच्यामध्ये पर्यावरण जाणीव जास्त दिसून येते.

४) पर्यावरणा संबंधी शिक्षक व विद्यार्थी तसेच पुरूष व स्त्रीया यांच्यामधील फरक शोधणे.

या संशोधनाचे महत्वपूर्ण निष्कर्ष खालील प्रमाणे आहेत.

१) संशोधनावरून असे दिसून येते की, ९५% शिक्षक व ९४% विद्यार्थी यांचा पर्यावरणासंबंधी अनुकुल दृष्टीकोन दिसून येतो.

२) पर्यावरणासंबंधी प्रशिक्षित शिक्षक व अप्रशिक्षित शिक्षक यांच्या दृष्टीकोनामध्ये फरक दिसून येत नाही.

३) विद्यार्थ्यांपेक्षा शिक्षकांच्यामध्ये पर्यावरण जाणीव जास्त दिसून येते.

४) प्रशिक्षित व अप्रशिक्षित शिक्षकांमध्ये पर्यावरण जाणीवामध्ये फरकदिसून येते नाही.

५) मुलींना, मुलांच्यापेक्षा पर्यावरणासंबंधी जास्त जाणीव आहे.

प्राणराज बी., (१९९१)

सेवानिवृत्त व सेवांतर्गत माध्यमिक शिक्षणांचा पर्यावरण शिक्षणाशी संबंधित पर्यावरण ज्ञान, दृष्टिकोन व अवबोध, या विषयावर संशोधन केले आहे.

संशोधनाची प्रमुख उद्दिष्टे पुढील प्रमाणे आहेत

१) सेवानिवृत्त व सेवातंर्गत माध्यमिक शिक्षकांची पर्यावरणासंबंधी ज्ञान व दृष्टिकोन शोधणे.

२) पर्यावरण शिक्षणासंबंधी त्यांचे अवबोध यांचा अभ्यास करणे.

या संशोधनाचे महत्वपूर्ण निष्कर्ष खालील प्रमाणे आहेत

१) सेवानिवृत्त शिक्षकांची पर्यावरण ज्ञानाची पातळी कमी असल्याचे दिसून आले परंतु संकल्पना ज्ञान मर्यादित होते.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

२) सेवांतर्गत शिक्षकांमध्ये पर्यावरण ज्ञान कमी असल्याचे दिसते.

३) सेवांतर्गत शिक्षकांचा पर्यावरण दृष्टीकोन सेवानिवृत्त शिक्षकांपेक्षा जास्तअसल्याचे जाणवते.

४) पर्यावरण ज्ञान व पर्यावरण दृष्टिकोन यामध्ये मर्यादित सहसंबंध दिसून येतो.

५) शिक्षक असे समजतात की पर्यावरण शिक्षण हा समाजशास्त्र, सामान्यविज्ञान तसेच विज्ञान विषय यांचा मुलभूत भाग आहे. (माध्यमिक स्तरावर)

६) त्याचबरोबर पर्यावरण शिक्षणात समुह संपर्क साधने महत्वाची भूमिका बजावितात.

थॉमस ए., (१९९१)

माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या पर्यावरण समस्येबाबत जाणीवांचा अभ्यास या विषयावर संशोधन केले आहे.

संशोधनाची प्रमुख उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत

१) निरनिराळ्या शाळेमधील शिकणाऱ्या माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या पर्यावरण समस्येसंबंधी जाणीवाचे मापन आणि तुलना करणे.

२) पर्यावरण समस्या उदा.- हवा प्रदूषण, पाणी प्रदूषण, भूमी प्रदूषण, ध्वनी प्रदूषण, लोकसंख्या वाढ आणि नैसर्गिक सानसंपत्तीचे संरक्षण इत्यादींचा अभ्यास करणे.

या संशोधनाचे महत्वपूर्ण निष्कर्ष खालील प्रमाणे आहेत :

१) विविध शाळेमध्ये शिक णाऱ्या विद्यार्थ्यामध्ये पर्यावरण समस्येबाबत सार्थक सहसबंध दिसून आला.

२) केंद्रिय माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यामध्ये पर्यावरण जाणीव जास्त दिसून आली. कारण अभ्यासक्रमामध्ये पर्यावरणावर भर दिलेला आहे.

३) पर्यावरण समस्येबाबत दहावीच्या विद्यासर्थ्यामध्ये जाणीव कमी असल्याचे दिसून आले. कारण पर्यावरण समस्येबाबत त्यांनी जास्त अध्ययन केलेले नाही.

गोपाळकृष्णन सरोत्रिनी, (१९९२)

पर्यावरण शिक्षणाचा प्राथमिक स्तरावरील मुलांच्यावर परिणाम - एक अभ्यास या विषयावर संशोधन केले आहे.

संशोधनाची प्रमुख उद्दिष्टे पुढील प्रमाणे आहेत

१) पर्यावरणाचे महत्वाचे घटक ओळखणे.

२) पर्यावरण शिक्षण चाचणीतून पर्यावरण शिक्षणाचा परिणाम पाहणे.

३) लहान प्रयोगाद्वारे सहभागींचा अध्ययन दृष्टीकोनावर झालेला परिणाम अभ्यासणे.

४) नियोजीत प्रश्नावलीद्वारे शिक्षकांना प्रत्याभरण देणे.

या संशोधनाचे महत्वपूर्ण निष्कर्ष खालील प्रमाणे आहेत

१) पर्यावरण शिक्षणाचा विद्यार्थ्यावर चांगला परिणाम होतो.

२) पर्यावरण शिक्षण चाचणीच्या प्राप्तांक विश्लेषणावरून असे दिसून येते की, मद्रासच्या विद्यार्थ्यांचे मध्यमान ४१.८५ हे कोईमतुर, निलगिरीच्या विद्यार्थ्यापेक्षा जास्त आहे.

३) सहभागींचा अध्ययन दृष्टीकोन हा पर्यावरण शिक्षणाचा चांगला परिणाम आढळतो.

४) सामान्यत: शिक्षकांना असे वाटते की विद्यार्थी केंद्रीत कृतींना वेळ आणि महत्व द्यायची गरज नाही.

साहू के.सी., (१९९२)

पर्यावरण शिक्षणाची संकल्पना व अवबोध यांचा चिकित्सक अभ्यास - या विषयावर संशोधन केले आहे.

संशोधनाची प्रमुख उद्दिष्टे पुढील प्रमाणे आहेत :

१) पर्यावरण संल्पना व पर्यावरणाचे घटक यांचा अभ्यास करणे.

२) पर्यावरण व मानव यांच्या परस्पर संबंधाचा अभ्यास करणे.

३) पर्यावरण चलनशास्त्राचा अभ्यास करणे.

४) पर्यावरण संकल्पनेमध्ये दुरूस्ती करणे.

या संशोधनाचे महत्वपूर्ण निष्कर्ष खालील प्रमाणे आहेत.

१) पर्यावरण संकल्पना ही मुख्यत: मानवनिर्मित व नैसर्गिक या प्रकारामध्ये विभागली आहे.

२) एकूण वनस्पती व प्राणीजात जीवशास्त्रीय पर्यावरण घडवितात/बनवितात.

३) वातावरण, जलावरण व मृद्रावरण अजैविक वातावरण बनविणे.

४) मानवनिर्मित पर्यावरण हे अनेक प्रकारचे आहे. उदा. सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक, सौंदर्यवाद, ऐतिहासिक, भौगोलिक, मानसशास्त्रीय, धार्मिक आणि शालेय इत्यादी.

५) निरनिराळ्या प्रकारच्या पर्यावरणाचे एकत्रीकरण होउन पर्यावरण ही संकल्पना बनते. मानव आणि पर्यावरण या मधील परस्पर संबंध हे जैविक स्वरूपाचे आहेत.

६) मूल्यमापनाच्या विविध अवस्था शोधणे, गोळा करणे, शेती टप्पा, औदयोगिक टप्पा या अवस्था परस्परसंबंध परावर्तीत करतात.

७) मानवाचे पर्यावरणावरील प्रभुत्व हळू हळू मानव व पर्यावरण संबंधामध्ये अडचणी निर्माण करीत आहे.

८) पर्यावरण संरक्षणासंबंधी प्रयत्न सुरू आहेत. मानवी जीवनाचा विकास मानवी कल्याण, भविष्यकाळातील व सांस्कृतिक प्रगती यामध्ये बदल होत आहे.

९) पर्यावरण संरक्षणासाठी स्व-व्यवस्था महत्वाची आहे.

१०) राष्ट्रीय व आंतराष्ट्रीय स्तरावर पर्यावरण शिक्षणाची संकल्पना विश्लेषण करण्यासाठी कार्यशाळा, समित्या, विविध संस्था कार्यरत आहेत. पर्यावरण शिक्षण ही एक अमूर्त संकल्पना आहे. तसेच पर्यावरण शिक्षणातून व्यक्तीला जीवनभर अनुभव मिळतात.

मुखर्जी सी., (१९९६)

कॉमर्स शाखेतील (पदवीधर) विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाची जाणीव - एक अभ्यास या विषयावर संशोधन केले आहे.

संशोधनाची प्रमुख उद्दिष्टे पुढील प्रमाणे आहेत

१) बी.कॉम विद्यार्थ्यांची पर्यावरण जाणीव, त्यांचे प्राविण्या आणि पर्यावरण अभ्यासासंबधी दृष्टीकोन यांचा परस्परसंबंधाचा अभ्यास करणे.

या संशोधनाचे महत्वपूर्ण निष्कर्ष खालील प्रमाणे आहेत.

१) पर्यावरण जाणीवांसदर्भात आणि प्राविण्यासंदर्भात लिंगभेदानुसार सार्थक संबंध दिसून येत नाही. (बी.कॉम स्तरावर) परंतु विद्यार्थ्यांचा पर्यावरण जाणीवासंदर्भात होकारार्थी दृष्टीकोन दिसून येतो. (विद्यार्थ्यांशी तुलना करता)

कारण स्त्री विद्यार्थीनी ही अभ्यासक्रम, आशय, अध्यापन पध्दती यामध्ये त्यांना आवड नसून परिक्षेच्या दृष्टीकोनातून अभ्यास करणे महत्वाचे मानतात. खोलवर विचार करीत नाहीत.

२.४ पर्यावरण जाणीव जागृती सामान्य निष्कर्ष :

संशोधनाशी संबंधीत साहित्याचा आढावा घेतलेल्या संशोधनाच्या निष्कर्षामधील प्रस्तुत संशोधन समस्येशी संबंधित सर्वसाधारणपणे निष्कर्ष पुढील प्रमाणे सांगता येतील.

१) प्राथमिक स्तरावर शिक्षाकाच्या अध्यापन अनुभवाचा पर्यावरण जाणीवावर अनुकूल परिणाम होतो. परंतु प्रदेशानुसार होणारा परिणाम गौण दिसून येतो.

२) पर्यावरण शिक्षण हा विषय एकात्मिक स्वरूपात घेण्याविषयीची जाणीव शिक्षकांना कमी आहे.

३) प्रशिक्षित व अप्रशिक्षित शिक्षकांमध्ये पर्यावरण जाणीवांमध्ये फरक दिसून येत नाही.

४) माध्यमिक स्तरावर शिक्षक असे समजतात की पर्यावरण शिक्षण हा समाजशास्त्र, सामान्यविज्ञान तसेच विज्ञान विषय यांचा मुलभूत भाग आहे.

५) केंद्रीय माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण जाणीव जास्त दिसून आली. कारण अभ्यासक्रमामध्ये पर्यावरणावर भर दिलेला आहे.

६) सामान्यता शिक्षकांना असे वाटते की, विद्यार्थी केंद्रीत कृतींना वेळ आणि महत्व दयायची गरज नाही.

७) राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर पर्यावरण शिक्षणाची संकल्पना विश्लेषण करण्यासाठी कार्यशाळा, समित्या, विविध संस्था कार्यरत आहेत. पर्यावरण शिक्षण ही एक अमुर्त संकल्पना आहे. तसेच पर्यावरण शिक्षणातून व्यक्तीला जीवनभर अनुभव मिळतात.

उपलब्ध साहित्याच्या निष्कर्षाच्या आधारे हे लक्षात येते की, संशोधनसाठी संशोधकाने जो विषय निवडला तो विषय पूर्वी कधीही संशोधनासाठी निवडलेला नाही. प्रस्तुत संशोधनात संशोधकाने विद्यार्थी शिक्षकांसाठी पर्यावरण विषयक समस्यांच्या संदर्भात जाणीव जागृती संचाची निर्मिती केली आहे कारण पर्यावरण व पर्यावरणीय समस्यांबाबत उदयाच्या शिक्षकाला जाणीवजागृती असणे आवश्यक आहे. तरच तो आपल्या अध्यापनातून तसेच अभ्यासपूरक व अभ्यासेत्तर कार्यक्रमामधून विद्यार्थामध्ये पर्यावरण विषयक समस्यांच्या संदर्भात जाणीव जागृती निर्माण करू शकेल.

२.५ समारोप :

सदर प्रकरणात पर्यावरण शिक्षणासंबंधीत असलेले संशोधन साहित्याचा आढावा घेतला आहे.

पुढील प्रकरणात प्रस्तुत संशोधनाच्या कार्यपध्दतीचा उहापोह केला आहे.